भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

कार्यपालक निदेशक
Executive Director

DoR.MAM/SO-07/09-16-901/2024-2025 March 03, 2025

**Order**

**Sanction of Scheme of Amalgamation under Section 44A read with Section 56 of the Banking Regulation Act, 1949- Jawahar Sahakari Bank Ltd., Hupri with Kallappanna Awade Ichalkaranji Janata Sahakari Bank Ltd.**

In exercise of the powers conferred under sub-section (4) of Section 44A read with Section 56 of the Banking Regulation Act, 1949, the Reserve Bank of India hereby sanctions the appended Scheme of Amalgamation of 'Jawahar Sahakari Bank Ltd., Hupri' with 'Kallappanna Awade Ichalkaranji Janata Sahakari Bank Ltd.'. The above Scheme of Amalgamation shall come into effect from March 10, 2025 ('operative date of amalgamation').

**2.** From the operative date of amalgamation, the properties / assets, liabilities, and rights of Jawahar Sahakari Bank Ltd., Hupri, will be transferred to and vest in Kallappanna Awade Ichalkaranji Janata Sahakari Bank Ltd., as per the appended Scheme of Amalgamation and thereby, Jawahar Sahakari Bank Ltd., Hupri, shall stand dissolved and cease to function in terms of the provisions of sub-section (6-A) of Section 44A read with Section 56 of the Banking Regulation Act, 1949.

(R. Lakshmi Kanth Rao)
Executive Director

**Encl**: Sanctioned Scheme of Amalgamation of Jawahar Sahakari Bank Ltd., Hupri with Kallappanna Awade Ichalkaranji Janata Sahakari Bank Ltd.

केंद्रीय कार्यालय भवन, शहीद भगतसिंह मार्ग, मुंबई - 400 001. भारत
फोन : +91-22- 2267 3338 ई-मेल : edrlkr@rbi.org.in
Central Office Building, Shahid Bhagat Singh Marg, Mumbai - 400 001. INDIA
Tel : +91-22-2267 3338 E-mail : edrlkr@rbi.org.in

हिंदी आसान है, इसका प्रयोग बढ़ाइए

# कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँक लि.,

**(मल्टी स्टेट शेडयूल्ड बँक)**

**जनता बँक भवन, मेन रोड, इचलकरंजी.**

---

## जवाहर सहकारी बँकेचे विलीनीकरणासंदर्भात वारंवार विचारात घेतली जाणारी प्रश्नावली

| अ.न. | प्रश्नावली | उत्तरे |
|---|---|---|
| १. | विलीनीकरणामुळे ग्राहक व ग्राहक सेवांवर काय परिणाम होतो? | विलीनीकरणामुळे ग्राहक आणि ग्राहक सेवांवर कोणत्याही प्रकारचा परिणाम होत नाही. किंबहुना, विलीनीकरणामुळे ग्राहकांना अद्ययावत वित्तीय सेवेचा लाभ मिळणार आहे. |
| २. | विलीनीकरणा संदर्भातील अधिकृत माहिती कोठे मिळू शकते? | विलीनीकरणासंदर्भातील अधिकृत माहिती भारतीय रिझर्व्ह बँकेच्या वेबसाईटवरील प्रेस रिलीज या कॉलममध्ये मिळू शकते. तसेच कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँकेच्या सर्व शाखा व बँकेच्या वेबसाईटवर म्हणजेच www.ijsbank.com वर मिळू शकते. |
| ३. | विलीनीकरणानंतर वैयक्तीक ठेवी सुरक्षित असणार काय? | विलीनीकरणानंतर कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँकेमध्ये ग्राहकांच्या सर्व ठेवी सुरक्षित असतील. किंबहुना, बँकेने प्रत्येक ग्राहकाच्या ठेवीवर DICGC अन्वये विमा संरक्षण दिलेले असल्यामुळे, सर्व ग्राहकांच्या ठेवी सुरक्षित आहेत. |
| ४. | विलीनीकरणानंतर ठेव किंवा कर्ज खात्यामध्ये काही बदल होणार काय? | विलीनीकरणानंतर प्रत्येक ठेव व कर्ज खात्याच्या नंबरमध्ये शाखा कोड व जीएल कोड अशा स्वरुपात अल्पसा बदल होणार असून, सदरचा बदल हा शाखेमध्ये उपलब्ध होणार आहे. |
| ५. | विलीनीकरणानंतर IFSC व MICR कोडमध्ये बदल होणार काय? | विलीनीकरणानंतर IFSC व MICR कोडमध्ये बदल होणार असून, नवीन IFSC व MICR कोड आपल्या माहितीकरिता बँकेच्या वेबसाईटवर www.ijsbank.com व शाखांमध्ये उपलब्ध होणार आहे. |
| ६. | विलीनीकरणानंतर ठेवीदार हा विलीन झालेल्या बँकेचा ठेवीदार होवू शकतो का? | विलीनीकरण तारखेपर्यंत असणारे बँकेचे सर्व ठेवीदार विलीनीकरणानंतर कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँकेचे ठेवीदार म्हणून संबोधले जातील. |

| | | |
|---|---|---|
| ७. | विलीनीकरणानंतर विलीन झालेल्या बँकेचे ठेवीदारांची ठेव खाती स्वतंत्र हेडखाली चालू केली जातील काय? | विलीनीकरणानंतर विलीन झालेल्या बँकेच्या ठेवीदारांची ठेव खाती, विलीनीकरण झालेल्या तारखेपासून, कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँकेच्या स्वतंत्र हेडखाली चालू केली जातील. |
| ८. | विलीनीकरण झालेल्या तारखेपासून, ठेवीदारांच्या ठेवीच्या व्याजामध्ये बदल होणार काय? | विलीन होणाऱ्या बँकेमध्ये ठेवीसाठी लागू असणारा मुळ व्याज दर हा त्या ठेवीच्या मुदतीपर्यंत व्याज दर लागू राहील. **(खाली नमूद केलेले उदाहरण विचारात घ्यावे.)** |

| ठेव दिनांक | ठेव रु. | व्याज दर | मुदत |
|---|---|---|---|
| **०१.०१.२०२५** | **१०००** | **८%** | **एक वर्षे (३१.१२.२०२५)** |

- **विलीनीकरणाची तारीख १०.०३.२०२५ असून, सदर ठेवीस दि. ३१.१२.२०२५ अखेर ठेव ठेवताना असलेला प्रचलित व्याज दर म्हणजे ८% इतका राहील व विलीनीकरणानंतरही सदरचा व्याज दर दिला जावून, यामध्ये कोणताही बदल होणार नाही.**

| | | |
|---|---|---|
| ९. | ठेवीची मुदत ही विलीनीकरण तारखेपूर्वी संपलेस, कोणता व्याज दर लागू राहील? | ठेवीची मुदत विलीनीकरण तारखेपूर्वी संपल्यास, मुदत संपलेल्या तारखेपासून विलीनीकरण तारखेपर्यत जवाहर सह. बँकेच्या सेव्हींग ठेवीवरील व्याज दरानुसार व्याज दिले जाईल. तथापि, विलीनीकरण तारखेनंतरच्या कालावधीकरिता अशा मुदत संपलेल्या ठेवींवर कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँकेकडून दिल्या जाणाऱ्या सेव्हींग ठेवीचे व्याज दरानुसार व्याजाची आकारणी केली जाईल. **(खाली नमूद केलेले उदाहरण विचारात घ्यावे.)** |

| ठेव दिनांक | ठेव रु. | व्याज दर | मुदत |
|---|---|---|---|
| **०१.०१.२०२४** | **१०००** | **८%** | **३१.१२.२०२४** |

- **ठेवीची मुदत दि. ३१.१२.२०२४ अखेर संपलेली असून, दि. ०१.०१.२०२४ पासून ते दि. ०९.०३.२०२५ अखेर, सदर ठेवीस जवाहर सहकारी बँकेच्या सेव्हींग ठेव खात्यास लागू असलेले व्याज दराप्रमाणे (उदा. २.५०% प्रमाणे) व्याजाची रक्कम आदा केली जाईल.**
- **दि. १०.०३.२०२५ पासून ठेव रक्कम आदा करेपर्यंतच्या कालावधीकरिता, कल्लाप्पाण्णा आवाडे जनता सहकारी बँकेच्या सेव्हींग ठेवीकरिता लागू असणाऱ्या (उदा. २.७५%) प्रचलित व्याज दराने व्याजाची रक्कम आदा केली जाईल.**

| | | |
|---|---|---|
| १०. | मुदत संपलेल्या ठेवींना विलीनीकरणानंतर नुतनीकरणासाठी कोणता व्याज दर आकारला जाईल? | ठेवीची मुदत, विलीनीकरण तारखेनंतर मुदत संपलेल्या ठेवींचे नुतनीकरण झाल्यास, मुदत संपलेल्या तारखेपासून विलीनीकरण तारखेपर्यंत कल्लाप्पाण्णा आवाडे जनता बँकेच्या सेव्हींग ठेवीवरील व्याज दरानुसार व्याज दर लागू राहील. उदा. |
| ११. | विलीनीकरणानंतर सर्व प्रकारच्या ठेवी, स्टेटमेंट देणेपूर्वी केवायसी घेणे आवश्यक आहे काय? | विलीनीकरणानंतर सर्व प्रकारच्या ठेवी, स्टेटमेंट देणेपूर्वी कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँकेकडून संबंधित ग्राहकांची केवायसी करुन घेणे अपरिहार्य आहे. तद्नंतरच खातेदारांला बचत किंवा अन्य खात्यावर व्यवहार करु देणेस परवानगी दिली जाईल. |
| १२. | विलीनीकरणानंतर ग्राहकास नवीन पासबूक, चेकबूकची व एटीएम्ची सुविधा उपलब्ध होणार काय? | विलीनीकरणानंतर कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँकेकडून ग्राहकांना नवीन पासबूक, चेकबूकची व एटीएम्ची सुविधा उपलब्ध करुन दिली जाईल. |
| १३. | विलीनीकरणानंतर ठेवीदार मुदतपूर्व ठेव मोडू शकतो का व मोडल्यास दंडव्याजाची आकारणी होणार का? | विलीनीकरणानंतरच्या एक महिन्यामध्ये ठेवीदार मुदतपूर्व ठेव मोडू शकतो व अशा मुदतपूर्व मोडलेल्या ठेवीस दंडव्याजाची आकारणी केवळ एक महिन्यापर्यंत आकारणी केली जाणार नाही. (**खाली नमूद केलेले उदाहरण विचारात घ्यावे.**) |

| ठेव दिनांक | ठेव रु. | व्याज दर | मुदत |
|---|---|---|---|
| **०१.०१.२०२५** | **१०००** | **८%** | **३१.१२.२०२५** |

- **जर सदरची ठेव, दि. १०.०३.२०२४ या विलीनीकरण तारखेपासून, दि. ०९.०४.२०२५ पर्यंत या एक महिन्याच्या कालावधीत, मुदतपूर्व मोडलेस, बँकेमध्ये ठेव ठेवत असताना बँकेच्या प्रचलित असलेल्या ठेवीवरील व्याज दराने म्हणजे ८% दरानेच व्याज दिले जाईल. या एक महिन्याच्या कालावधीत मोडल्या जाणाऱ्या ठेवीकरिता कोणतेही मुदतपूर्व दंड व्याज आकारले जाणार नाही.**
- **दि.१०.०४.२०२५ नंतर, मुदतपूर्व मोडल्या जाणाऱ्या ठेवीकरिता, कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँकेच्या ठेवीसंदर्भातील नियमानुसार, मुदतपूर्व मोडत असलेलया ठेवीच्या पूर्ण झालेल्या कालावधीचा विचार करता, ठेव ठेवलेल्या तारखेवेळी लागू असलेल्या प्रचलित व्याज दरापेक्षा १% व्याज दर कमी करुन होणारी व्याजाची रक्कमेसह ठेवीची रक्कम आदा केली जाईल.**

| | | |
|---|---|---|
| १४. | विलीनीकरण होणेपूर्वी डॉरमंट/ इनऑपरेटीव्ह खात्यांची केवायसी करणे आवश्यक आहे का? | विलीनीकरण होणेपूर्वी जर खाते डॉरमंट/इनऑपरेटीव्ह असलेस, अशा खात्यांची केवायसीची पुर्तता करुन घेणे बंधनकारक राहील. |

| | | |
|---|---|---|
| १५. | विलीनीकरण झालेनंतर जवाहर सह. बँकेच्या सभासदांना दिल्या जाणाऱ्या शेअर्स रक्कमेमध्ये काही बदल होतील काय? | विलीनीकरण तारखेस, जवाहर सह. बँकेची नेटवर्थ Positive आहे किंवा Negative आहे ही बाब विचारात घेवून, भागधारकाला, त्याच्या मागणीनुसार, त्याच्या भागाची पुर्ण रक्कम देण्याचा अधिकार कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सह. बँकेस राहील. तथापि, या रक्कमेवरील कोणत्याही प्रकारचे व्याजाची किंवा लाभांशाची रक्कम भागधारकाला दिली जाणार नाही. |
| १६. | भागधारकाला त्याच्या भागाची पुर्ण रक्कम परत मिळण्यासाठी किती दिवसात अर्ज करावा लागेल? | भागधारकाला त्याच्या भागाची पुर्ण रक्कम परत मिळण्यासाठी विलीनीकरण तारखेपासून ९० दिवसाच्या आत अर्ज करावा लागेल. |
| १७. | भागधारकाला त्याच्या भागाची पुर्ण रक्कम परत मिळण्यासाठी भागधाकारकाने अर्ज केला नसल्यास, शेअर्सचे काय होणार? | भागधारकाला त्याच्या भागाची पुर्ण रक्कम परत मिळण्यासाठी भागधाकारकाने कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँकेकडे रितसर अर्ज केला नसल्यास, त्याला कल्लाप्पाण्णा आवाडे जनता बँकेचे सभासदत्व प्राप्त करुन दिले जाईल. सदरचे सभासदत्व सहा महिन्याच्या आत दिले जाईल. |
| १८. | विलीनीकरणानंतर कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता बँकेचे शेअर्सची रक्कम धारण करणे आवश्यक आहे काय? शेअर्सची रक्कम धारण न केल्यास सभासदत्व रद्द होईल काय? | विलीनीकरणानंतर कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता बँकेचे शेअर्सची रक्कम रु.२५००/- इतकी रक्कम धारण करणे आवश्यक आहे. सदरची रक्कम कमी असेल तर ही रक्कम धारण करणेसाठी दोन वर्षाचा कालावधी बँकेकडून दिला जाईल व तद्नंतर सदरचे सभासदत्व रद्द करणेचा अधिकार कल्लाप्पाण्णा आवाडे जनता बँकेस राहील. |
| १९. | जर सभासदाकडे मुळ सभासद प्रमाणपत्र नसलेस काय करावे लागेल? | जर सभासदाकडे बँकेने दिलेले मुळ सभासद प्रमाणपत्र नसले तर, विलीनीकरणानंतर सदर सभासदत्वास कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँकेकडे, संबंधित सर्व कागदपत्रांसह, अर्ज करावा लागेल. सर्व कागदपत्रांची शहानिशा केलेनंतर कल्लाप्पाण्णा आवाडे जनता बँकेचे मुळ सभासदत्व प्रमाणपत्र दिले जाईल. |
| २०. | Outward RTGS/NEFT पेमेंट सिस्टीमची सुविधा विलीनीकरणानंतर उपलब्ध होणार काय? | विलीनीकरणानंतर कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँकेच्या माध्यमातून Outward RTGS/NEFT पेमेंट सिस्टीमची सुविधा उपलब्ध होणार आहे. |
| २१. | Inward RTGS/NEFT पेमेंट सिस्टीमची सुविधा विलीनीकरणानंतर उपलब्ध होणार काय? | विलीनीकरणानंतर शाखेचा बदललेला IFSC code घेवून, योग्य खाते नंबर नमूद करुन मगच Inward RTGS/NEFT बाहेरील बँकेकडून स्विकारली जाईल. त्यासाठी संबंधित शाखा व्यवस्थापकशी संपर्क साधावा. |

| | | |
|---|---|---|
| २२. | विलीनीकरणानंतर नवीन एटीएम् कार्डची सुविधा उपलब्ध होणार काय? | विलीनीकरण झाल्यानंतर जवाहर सह. बँकेचे एटीएम् कार्ड घेवून, कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता बँकेचे नवीन एटीएम् कार्डची सुविधा उपलब्ध करुन दिली जाईल. |
| २३. | कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता बँकेकडून कोणत्या डिजीटल सुविधा दिल्या जातात? | कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता बँकेकडून इंटरनेट बँकींग, मोबाईल बँकींग, पॉज् मशिन, QR Code, UPI, RTGS, NEFT, ATM सुविधा, कॅश/चेक डिपॉझीट मशिन, विदेशी वित्त ट्रान्सफर या व यासारख्या अनेक डिजीटल सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात. |